पुढारी – २३/०३/२००८

# पर्यावरणाचा बळी देऊन औद्योगिक विकास नको....!



पुणे : 'देशाच्या किंबहुना जगाच्या प्रगतीसाठी औद्योगिक विकास आवश्यकच आहे. परंतु हे करीत असताना मूळच्या पर्यावराला धक्का लागणार नाही, याची काळजी घ्यावयास हवी. असे प्रतिपादन केंद्रीय विज्ञान आ तंत्रज्ञान सचिव डॉ. टी. रामासामी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराईचे प्रमुख डॉ. मोहन धारिया होते. इटली येथील व्हेनिस विद्यापीठाचे प्रा. सल्वाटोर डॅनिलयल, नागपूर येथील नॅशनल एनव्हिरॉनमेंटल इंजिनिअरिंग इन्स्टिटट्यूशनचे संचालक डॉ. टी. चक्रवर्ती व वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठातील इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. एस. एन. उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषद नियंत्रा मंडळाचे उपसंचालक देवळे एमआयटीचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. मंगेश कराड एमआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य एस. एन. कौल, एमआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे उपप्राचार्य एन.पी. देशपांडे व प्रा. सुधीर राणे उपस्थित होते.

डॉ. टी. रामासामी म्हणाले, ‘‘मनुष्याच्या गरजा भागविण्यासाठी निरनिराळ्या वस्तू निर्माण कराव्या लागतात. त्यासाठी कारखान्यांची उभारणी आवश्यक ठरते. अन्नधान्यांच्या वितरणासाठी वाहने असावी लागतात, त्यांचेही उत्पादन कारखान्यातच होते. ‘‘डॉ. मोहन धारिया म्हाले, गेल्या काही दशकात अपरिमीत स्वरूपाच्या वृक्षतोडीमुळे अनेक तोटे झाले आहेत. तापमानवाढ हा त्यापैकी एक घटक आहे. जेथे दाट जंगल आहेत. तेथे नक्षलवादी कारवाया दिसून येतात, म्हणून वनांचे रक्षण करण्याकडे आपण दुर्लक्ष करतो. डॉ. विश्वनाथ कराड यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रा. एन. पी. देशपांडे यांनी मानले.